**विशेष दिवाणी दावा क्र.३२/२००७ नि.क्र.२२३ वरील आदेश**
**(विक्रमसिंह देशमुख विरुध्द दिलीपराव शिंदे )**
**(CNR No.MHSN050014452007)**

१. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

२. वादीचे कथन की, प्रकरणातील वादी क्र.१ व २ पैकी वादी क्र.२ याचे निधन झाले आहे. सदर वादी हा विनापाश मयत झाला आहे. वादी क्र.१ हा त्याचा भाऊ असून त्याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे प्रस्तुत वादीस स्वतःसाठी व त्याच्यातर्फे दावा चालविण्याचा पुर्ण अधिकार आहे. करीता वादी क्र.२ याच्या नावापुढे 'मयत' असे लिहून कंस करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ तर्फे अर्जास ठाम आक्षेप घेण्यात आला. त्यांचे कथन की, अर्ज बेकायदेशीर असून त्यात पुरेशी माहीती नमूद नाही. वादी क्र.२ याचे लग्न झाले किंवा नाही याबाबत स्पष्टता नाही. तसेच लग्न झाले असल्यास पत्नीच्या बाबत कोणतेही कथन नाही. वादी क्र.२ हे विनापाश मयत झाले आहेत असे गृहीत धरले तरी प्रस्तुत वादीशिवाय अन्य कोणी त्यांना वारस नाही याबाबत कोणतेही गृहीतक नाही. म्हणून अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

४. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. सर्वप्रथम येथे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुत अर्जाद्वारे

दाव्यातील वादींपैकी एका वादीने सहवादी मयत झाल्याचे नमूद करुन त्याचे नाव कमी करण्याची विनंती केली आहे. प्रकरणाचे अवलोकन करता वादीचा मृत्यू दाखला संचिकेत दाखल आहे. त्याप्रमाणे वादी क्र.२ मयत असल्याबाबत शंका निर्माण व्हावी असे कोणतेही कथन किंवा तशी परिस्थिती दाव्यात उपलब्ध नाही.

६. हे खरे आहे की, एखादया दाव्यामध्ये जेव्हा दोन्ही वादींचा समान हितसंबंध असतो अशा वेळेस एका वादीला प्रकरण काढून घेण्याची परवानगी देणे योग्य नाही. परंतु येथे वादी क्र.२ मयत झाला आहे याबाबत दुमत नाही.

७. प्रतिवादीने वादीच्या लग्नाबाबत व त्याच्या वारसांबाबत प्रश्न निर्माण केलेले आहेत. हे खरे आहे की, विवाह अथवा अपत्य याबाबत खुलासा नाही. परंतु विनापाश या शब्दामध्ये सर्व बाबी समाविष्ठ होतात. हे खरे आहे की, विनापाश मयत व्यक्तीस त्याचा भाऊ व इतर असे वर्ग –२ चे वारसदार असू शकतात. परंतु प्रस्तुत दावा नातेसंबंधांना निश्चित करण्याचा नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये सुचविलेल्या दुरुस्तीद्वारे वारसांना निश्चित करण्याचा संबंध नाही. स्थावर मिळकतीमध्ये मयताच्या हितसंबंधाचे जतन होण्यासाठी व त्याला प्रतिनिधित्व मिळण्यासाठी प्रत्येक वेळेस वारसच दाखल करण्यात यावेत असा कायदा नाही. सदर तरतुदीमध्ये कायदेशीर प्रतिनिधी असा शब्दप्रयोग आहे. त्यामध्ये मयताच्या नावावर असलेल्या मिळकतींमध्ये ज्याचा हितसंबंध मयताच्या हितसंबंधाच्या विपरीत नाही व प्रत्यक्ष हितसंबंध गुंतलेला आहे असा व्यक्ती प्रतिनिधी म्हणून पुढे काम पाहू शकतो.

८. या ठिकाणी मयत वादी क्र.२ च्या बहीणी व इतर वर्ग–२ नातेवाईकांविषयी कोणताही खुलासा नाही. परंतु वादी क्र.१ हा भाऊ असल्याबाबत आक्षेप नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वादी क्र.१ यास स्वतःसाठी व मयत वादी क्र.२ साठी दावा चालविण्याचा अधिकार आहे. करीता वादीने विनंती केल्याप्रमाणे वादी क्र.२ च्या नावापुढे 'मयत' लिहून त्यांच्या नावास कंस करण्याच्या विनंतीमुळे मयताच्या प्रतिनिधीत्वावर परिणाम होतो अशी परिस्थिती दर्शविलेली नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य आहे, या निष्कर्षास येवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ यांनी दावा पत्रात आपवश्यक दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.03.01 13:16:34 +0530

इस्लामपूर, ( मुकूल म. चितळे)

दिनांक : ०१/०३/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर.

## C E R T I F I C A T E

" I affirm that the contents of this PDF file order are the same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno with Post | : | Shri. S. K. Patil<br>(Stenographer Grade-II) |
| Name of the Court | : | Jt. Civil Court Senior Division Islampur. |
| Date of pronouncement of order | : | 01/03/2024 |
| Order signed by the P.O.on | : | 01/03/2024 |